INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.625

E-ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March 2021

Vol.-VIII, Issue-I (B)



Chief Editor -

Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :

Nashikroad (English)
Kinwat (Hindi)
Bhusawal (Marathi)
Goa (Konkani)

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol.-VIII, Issue-I (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 01 | आदिवासी लोकगीतातील स्त्रीवास्तव | प्रा.राजू शनवार | 05 |
| 02 | दशावतार : एक लोककला | डॉ. अंजली मस्करेन्हस | 09 |
| 03 | तडवी समाज आणि संस्कृती | डॉ. धनराज धनगर | 15 |
| 04 | आंध्र प्रदेशातील विठ्ठल भक्तीचे स्वरूप | डॉ.प्रभाकर घोडके | 24 |
| 05 | देवदासी प्रथा धार्मिक व सांस्कृतिक परंपरा | डॉ.गजानन भामरे | 29 |
| 06 | तुकारामाची कविता - एक चिंतन | डॉ. निशा जोशी | 32 |
| 07 | रामदासांचे 'मनाचे श्लोक' : एक विश्लेषणात्मक चिंतन | प्रा. अमृता डोर्लीकर | 37 |
| 08 | ओवीगीतातील आई | डॉ. अनिता सोनवणे | 42 |
| 09 | राष्ट्रसंताच्या अभंग गाथेतील विविध देवता | डॉ. प्रवीण कारंजकर | 46 |
| 10 | उपेक्षितांचे जीवनदर्शन घडविणारी श्रेष्ठ कादंबरी 'ब्रळी' | डॉ. रेखा वडिखाये | 51 |
| 11 | अण्णाभाऊ साठेंच्या महाराष्ट्र संसकृतीची यशोगाथा गौरवणाऱ्या पद्यरचना | प्रा. सोमनाथ पावडे | 57 |
| 12 | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील भटक्या जमातींचे लोकजीवन | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 61 |
| 13 | साठोत्तरी मराठी कवितेतील महानगरी आशयसूत्रे | डॉ. भरतकुमार भालेराव | 64 |
| 14 | ग्रामीण कादंबरीतील बदलते ग्रामवास्तव | डॉ. वाल्मिक आढावे | 71 |
| 15 | 'अजूनही बरंच काही बाकी' - दिनकर मनवर यांची कविता : एक चिंतन | डॉ. सुरेश बर्धे | 76 |
| 16 | मायबापाच्या जीवनाची व्यक्त झालेली विचार माळ : 'सूर्याची मशाल बाप माझा' | डॉ. प्रमोद गारोडे | 85 |
| 17 | डॉ. दिलीप धोंडगे यांचे ललित स्तंभलेखन : एक दृष्टीकोन | प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. सुरेश जाधव | 91 |
| 18 | 'हरवलेली माणसं' निघालीत माणुसकीच्या शोधात ! | डॉ. मारोती घुगे | 95 |
| 19 | आदिवासी कादंबरीतील भिल्ल जमातीच्या लोकसंस्कृतीचा आविष्कार | प्रा. विनायक राऊत, डॉ. कांचन नलवडे | 102 |
| 20 | युवकांना आत्मबळ देणारा ग्रंथ : कर हर मैदान फतेह | डॉ. भाऊसाहेब गमे | 107 |
| 21 | भगतसिंग यांचे धार्मिक विचार | डॉ. राजेंद्र रासकर | 113 |
| 22 | भुसावळ तालुक्याचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग | डॉ. जगन्नाथ गोपाळ | 118 |
| 23 | १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यादरम्यान रायगड जिल्ह्यातील सरकारी केंद्रावरील हल्ले | डॉ. भानुदास शिंदे | 123 |
| 24 | राजर्षी शाहू महाराज यांची कल्याणकारी राजकीय व्यवस्था | डॉ. देविदास नरवाडे | 126 |
| 25 | आधुनिक संदर्भात महात्मा गांधी यांच्या श्रमविषयक विचारांची उपयुक्तता | डॉ. जी. डी. घोडे | 130 |
| 26 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची वाचन अभिरुची व ग्रंथसंपदा | डॉ. प्रशांत पगाडे | 134 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'मूकनायक' आणि 'सामाजिक न्याय' विचार | डॉ. संभाजी पाटील, प्रा. बापूसाहेब जवळेकर | 138 |
| 28 | पंडित जवाहरलाल नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची प्रस्तुतता | डॉ.सुनिल पिंपळे | 149 |
| 29 | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे अस्पृश्य निवारणाचे कार्य : एक चिंतन | प्रा. सुनिलदत्त गोडसे | 153 |
| 30 | महिला सशक्तीकरण धोरणाचा आढावा | डॉ. चांगदेव मुंढे | 156 |

| | | |
|---|---|---|
| 31 | महिलांचा राजकीय प्रचार मोहिमेतील सहभाग : विशेष संदर्भ कर्जत तालुका **डॉ. चंद्रकांत गोंधळी** | 162 |
| 32 | मराठवाड्यातील महिला समुपदेशन केंद्रांची महिला तक्रार निवारणातील भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन **प्रा. श्रीमती इंदू साळुंखे** | 170 |
| 33 | ओतारी समाजातील स्त्रीचे स्थान **प्रा. विक्रम ओतारी** | 175 |
| 34 | लोणारी समाजातील विधवा महिलांच्या समस्येचा समाजशास्त्रीय दृष्ट्या अभ्यास **डॉ. संजय शिंदे** | 178 |
| 35 | कोरोना काळात मोलकरणींच्या कुटुंबियांवर झालेल्या परिणामांचे अध्ययन **डॉ. नारायण गाढे** | 189 |
| 36 | शेतकऱ्यांचे मानसिक आरोग्य- एक दृष्टिक्षेप **डॉ. अनिल वाघ** | 193 |
| 37 | पश्चिम महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचा चिकित्सक अभ्यास **प्रीती दीक्षित, प्रा. ए. आर. मुंगी, प्रा. ए. वाय. दीक्षित** | 199 |
| 38 | भारतातील राजकीय गुन्हेगारीकरण : एक अभ्यास **प्रा. ए. पी. वनारसे** | 206 |
| 39 | गायत्री शक्तीपिठाच्या नवरात्री उत्सवातील मंत्रसाधना- वैज्ञानिक दृष्टी **डॉ. रजनी लुंगसे** | 210 |
| 40 | बँकांचे विलीनीकरण धोरणाचा चिकित्सक आभ्यास **डॉ. नीता वाणी** | 215 |
| 41 | स्वामीनाथन आयोगाचे अवलोकन **डॉ. एस. पी. देवरे** | 220 |
| 42 | केंद्रीय कृषी योजना : सिंहावलोकन **डॉ. एम. व्ही. हिरे** | 224 |
| 43 | प्रधानमंत्री मुद्रा योजना - अवलोकन **डॉ. आर. के. जाधव** | 228 |
| 44 | मुलभूत सुविधा आणि कृषी विकास **डॉ. बी. एम. सोनवणे** | 232 |
| 45 | ग्रामीण विकासात लोकांच्या सहभागाची आव्हाने **डॉ. मारुती केकाणे** | 236 |
| 46 | टाळेबंदी (लॉक डाऊन) नंतरची ग्रामीण अर्थव्यवस्था - विशेष अभ्यास **डॉ.सुरेश ढाके** | 244 |
| 47 | भारतीय नवीन कृषी धोरण २०२० : एक दृष्टिक्षेप **डॉ. गोरखनाथ वाकळे** | 249 |
| 48 | नवीन कृषी धोरण (कायदे) २०२० : संधी आणि समस्या **प्रा. देवानंद मंडवधरे** | 254 |
| 49 | राष्ट्रीय कृषी धोरण २०२० : एक विपलेशणात्मक अभ्यास **डॉ. रामदास मुक्टे** | 259 |
| 50 | कोल्हापूर विभागातील १९ वर्षे वयोगटातील खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेचे घटक आणि हँडबॉल कौशल्यांच्या दर्जाचा अभ्यास **श्रीनिवास पाटील** | 265 |
| 51 | व्यक्तिमत्त्व विकासात खेळाचे महत्त्व **डॉ. मनिष देवरे** | 272 |
| 52 | विना साहित्य व्यायामाचा कुमार गटातील विद्यार्थ्यांच्या स्नायूंची ताकद व दमदारपणावर होणारा परिणाम **विशाल गायकवाड, आदित्य कुलकर्णी** | 276 |
| 53 | कोल्हापूर विभागातील १९ वर्षे वयोगटातील हँडबॉल खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेचे घटक आणि हँडबॉल कौशल्य यातील सहसंबंधाचा अभ्यास **श्रीनिवास पाटील** | 279 |
| 54 | भगतसिंग यांचे युवकांच्या संबंधीचे विचार **डॉ. राजेंद्र रासकर** | 285 |
| 55 | आधुनिक ज्ञानयुगाचा सारथी : शिक्षक **श्री.विपीन वैराट** | 289 |
| 56 | उच्च शिक्षणात माहिती व तंत्रज्ञानाचे महत्त्व **डॉ. अनमोल शेंडे** | 295 |
| 57 | विधीसंघर्षग्रस्त मुलांची प्रवृत्ती **डॉ. अशोक सातपुते** | 300 |
| 58 | राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि आप्तवाक्य : एक तात्त्विक विश्लेषण **डॉ.राजेसाहेब मारडकर** | 304 |
| 59 | गावडी बोलीचो व्याकरणीक आनी भासविज्ञानीक नदरेंतल्यान अभ्यास **दिपराज सातोर्डेकार** | 311 |

E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

# मुलभूत सुविधा आणि कृषी विकास

डॉ. बी. एम. सोनवणे
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र,
म. स. गा. महाविद्यालय, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.
Mail –

**प्रस्तावना :–**

प्राचिन काळापासुन भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणुन ओळखली जाते. शेती क्षेत्रात ७१ टक्के लोकसंख्येला रोजगार हा शेतीतच उपलब्ध होत होता. शेती हीच समाजाची जीवनवपध्दती निर्माण झालेली होती. भारतात ब्रिटिशांचे प्रशासन अस्तित्वात येण्यासाठी भारतातील नैसर्गीक संपदा व कृषी उत्पादन हेच प्रमुख कारण कारणीभूत ठरले असे म्हटल्यास चुकिचे ठरणार नाही. १७५० ते १८५० हा शंभर वर्षाचा कालखंड 'औद्योगिक जडणघडणीचा' कालखंड म्हणून ओळखला जातो. याच कालावधीत यंत्रसामुग्रीचा वापर उत्पादन करण्यासाठी केला जाऊ लागला. याला 'औद्योगिक क्रांती' असे म्हटले जाऊ लागले. औद्योगिक क्रांतीमुळेच भारतातील शेतात उत्पादीत झालेला कापूस, ताग, तेल संवर्गातील उत्पादन, ऊस व अन्नधान्य आदी पिकांना औद्योगिक क्रांतीमुळे मोठया प्रमाणात मागणी वाढली. ब्रिटिश कालावधीत भारतातील कृषी मालाला मागणी वाढून देखील कृषीचा व कृषकाचा (शेतकऱ्यांचा) आर्थिक विकास झाला नाही. उलट शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण मोठया प्रमाणात वाढले. तेव्हा दादाभाई नौरोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या तज्ञांनी भारतातील शेतकऱ्यांचे कशा प्रकारे शोषण केले जात आहे, हे शेतकऱ्यांच्या व ब्रिटिश प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. मात्र तरी देखील शेतकऱ्यांचे शोषण कमी झाले नाही, तर ते वाढतच गेले. शेती करणारा शेतकरी सावकारी कर्जाच्या विळख्यात अडकल्यामुळे शेतात सुधारणा झाल्याच नाहीत. यामुळे शेती करणाऱ्या ७१ टक्के लोकसंख्येची आर्थिक व सामाजिक स्थिती हालाखिची झाली व समाजजीवन ढासळले.

भारताला ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तत्कालीन शासनकर्त्यांनी कृषीक्षेत्रात सुधारणा करण्याचे धोरण स्विकारले. तेव्हा भारताने नियोजनाचा मार्ग स्विकारलेला होता. म्हणून १९५१ ते १९५६ या पहिल्या पंचवार्षिक योजना काळात कृषीच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले. ''पहिली पंचवार्षिक योजना २३७८ कोटी रूपये येवढया खर्चाच्या तरतुदीची होती. या योजनेत 'सिंचन आणि उर्जा' यासाठी २७.२ टक्के खर्चाची तरतुदी होती तसेच 'कृषी आणि समुदाय विकासासाठी' १७.४ टक्के खर्च, भूमिहीन शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी ४.१ टक्के खर्च करण्याची तरतुद केलेली होती.''[१] या खर्चाच्या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, ग्रामीण भागातील कृषीच्या विकासासाठी भरीव स्वरूपाची तरतुद या पहिल्या योजनेत होती. यानंतर प्रत्येक पंचवार्षिक योजनेत कृषीच्या विकासासाठी आर्थिक तरतुद करण्यात आली. कृषीसाठी सिंचन सुविधा, वीज, चांगले रस्ते आणि सक्षम विपणन व्यवस्था निर्माण करण्यात आली. परंतु कृषी क्षेत्राचा विकास कधीही उद्दिष्टानुरूप झालेला नाही. हे वास्तवदर्शी सत्य आहे. प्रस्तुत संशोधन लेखात कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मुलभूत सुविधा कशा उपयुक्त आहेत या संदर्भात विवेचन केलेले आहे.

**संशोधन लेखाची उद्दिष्टे :–** प्रस्तुत संशोधन लेखाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) कृषी क्षेत्राच्या विकासाची माहिती अभ्यासने.
२) योजना काळातील कृषी विकास अभ्यासने.

३) कृषी विकासासाठी मुलभूत सुविधांची माहिती अभ्यासने.

४) कृषी विकासासाठी मुलभूत सुविधांची परिणामकारकता अभ्यासने.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधन लेखाच्या तथ्य संकलनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे. यासाठी पूर्व प्रकाशित संदर्भ ग्रंथ, संकेत स्थळे यांचा वापर केलेला आहे. संकलित केलेल्या तथ्यांच्या विश्लेषणसाठी 'अर्थशास्त्रीय विशलेषण तंत्राचा' उपयोग करून घेतलेला आहे. यामुळे उद्दिष्टानुरूप संशोधन लेखाची निर्मिती करता आली व निश्चित असे निष्कर्ष मांडता आले आहेत.

**तथ्यांचे विश्लेषण :—**

व्यक्तीच्या मुलभूत गरजा म्हणून अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य सुविधा आणि पिण्याचे शुध्द पाणी या सहा मुलभुत गरजांचा विचार केला जातो. याच प्रमाणे कृषीसाठी सुध्दा ''वीज, सिंचन सुविधा, रस्ते, दळणवळण सुविधा आणि कृषी विपणन या पाच मुलभूत सुविधांची आवश्यकता असते.''[२] या सुविधांची उपलब्धता पुरेशी असली तर कृषी विकासाला प्रबळ चालना मिळू लागते आणि कृषी क्षेत्राचा विकासदर वाढायला चालना मिळू लागते. भारतात कृषी विकासासाठी या सर्व सुविधा टप्प्या—टप्प्याने निर्माण करण्यात आल्या आहेत. मात्र या सुविधा पुरेशा नाहीत. ज्या सुविधा उपलब्ध आहेत त्यांचा दर्जा देखील गुणवत्तेचा नाही, यामुळेच कदाचित कृषी क्षेत्राचा विकासदर उद्दिष्टानुरूप झालेला नाही हे वास्तव सत्य आहे. भारतात कृषी क्षेत्राच्या विकासासाठी शासन स्तरावरून प्रयत्न केले जात आहेत, मात्र भारतातील शेतकरी संघटीत नाहीत, अर्धशिक्षित शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक असल्यामुळे कृषी सुधारणा शेतकऱ्यांच्या पचनी पडत नाहीत. सत्ताधारी नेतृत्वाला 'आपणच शेतकऱ्यांचे खरे कैवारी' असे वाटते. तर विरोधकांचा दृष्टीकोण मात्र सत्ताधरी हे शेतकरी विकासाच्या ज्या योजना राबवतात त्या सर्व शेतकरी विरोधीच आहेत असा असतो. अशी सत्य परिस्थिती भारतात बघायला मिळते. राजकीय नेतृत्व संधी साधण्याचा प्रयत्न करते तर शेतकरी मात्र गोंधळलेल्या मन:स्थितीतच शेती पिकवतो याचा परिणाम कृषी विकासावर झालेला बघायला मिळतो.

भारतात कृषीक्षेत्राकडून विजेच्या मागणीत मोठया प्रमाणात वाढ होते आहे. भारतातील ६९ टक्के शेकरी शेतात विजेचा वापर करतात. मात्र कृषीक्षेत्राला उच्च दाबाचा आणि नियमित वीजपुरवठा होत असलेला दिसून येत नाही. ही खेदाची बाब आहे. सातत्यपूर्ण वीज पुरवठा झाल्यास कृषी क्षेत्राला मोठया प्रमाणात फायदा होऊ शकतो. येथे एक बाब नमुद करावीशी वाटते. शेतकऱ्यांना उच्च दाबाचा व नियमित वीज पुरवठा अपेक्षीत आहे, मात्र वीजेचे बील मात्र नियमित भरण्यात सुट देखील अपेक्षित आहे. या परिस्थितीमुळेच शेतीसाठी वीजेची समस्या म्हणावी तशी सुटलेली नाही.

''भारतात कृषीच्या विकासासाठी सिंचन सुविधेत वाढ करण्याचा प्रयत्न पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून केला जातो आहे''[३] विद्यमान सरकारने ''२००९ मध्ये भारत निर्माण योजनेच्या माध्यमाने १० दशलक्ष हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे लक्ष निर्धारित केले होते.''[४] भारतात सिंचनक्षमता वाढविण्यासाठी मोठे, मध्यम आणि लघु सिंचन प्रकल्प निर्माण करण्याचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले मात्र मागील दशकापासून सिंचनाचे प्रकल्प दुष्काळ निवारण्यासाठी वापरले जात आहेत. यामुळे सिंचनक्षमता अपेक्षेप्रमाणे वाढलेली नाही. भारतात पावसाळ्यात उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील बहुत:श भागात पुरसदृष्य परिस्थिती निर्माण होते. मात्र उन्हाळयात याच भागामध्ये अवर्षणाची परिस्थिती निर्माण होते हे भारतातील वास्तव सत्य आहे. यामुळे कृषी विकास खुंटलेला आहे.

E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

शेतकऱ्यांचा कृषी माल हा नाशवंत स्वरूपाचा असल्यामुळे त्याला त्वरीत बाजारपेठेत विक्रीसाठी घेऊन जाणे आवश्यक असते. त्यासाठी वाहतुक व्यवस्था आणि कृषी विपणन व्यवस्था चांगल्या दर्जाची असणे आवश्यक असते. भारताला स्वातंत्र्य मिळून ७३ वर्षे पूर्ण झालेले आहेत. या दरम्यानच्या कालावधित ग्रामिण भागात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी शासन स्तरावरून मोठया प्रमाणात प्रयत्न करण्यात आले. स्वतंत्र ग्रामीण विकास मंत्रालयाची स्थापना करून ग्रामीण विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले. ''ग्रामीण भागातील रस्ते हे मुख्य रस्त्यांना जोडण्यासाठी तत्कालीन केंद्र सरकारने २५ डिसेंबर २००० रोजी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना''[1] सुरू केली. यामुळे ग्रामीण भागात पक्के रस्ते निर्माण करण्याच्या कामाला शासकीय इच्छाशक्तीचे व आर्थिक शक्तींचे पाठबळ मिळाले. यामुळे दळणवळणाच्या-वाहतुकीच्या सुविधा अधिक सुलभ झाल्यात. शेतकऱ्यांना त्यांचा कृषीमाल बाजारपेठेपर्यंत चांगल्या स्थितीत वाहून नेणे शक्य झाले. पण ग्रामीण भागातील रस्त्यांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, बहुतांश रस्ते हे निकृष्ठ दर्जाचे आहेत. ते पावसाळयात लवकर बाधित होतात. यामुळे वाहतूक व्यवस्था प्रभावित होते. अशा रस्त्याने नाशवंत कृषी मालाची वाहतूक केली असता कृषीमालाचा दर्जा खालावतो. वाहतूकीचा वेळ आणि खर्च यात मोठया प्रमाणात वाढ होते. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते.

''शेतकऱ्यांच्या कृषी मालाची लुबाडणुक होऊ नये, कृषीमालाला योग्य किंमत मिळावी, किंमत मिळण्यासाठी लिलाव पध्दतीत स्पर्धा व्हावी व शेतकऱ्यांच्या मालाचे पैसे मिळण्याची हमी देता यावी यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा १९६४ मध्ये करण्यात आला. या कायदयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी १९६७ मध्ये करण्यात आली.''[5] कृषी उत्पन्न बाजार समित्यांची सहकार तत्वावर स्थापना झाल्यामुळे या बाजार समितीत शेतकऱ्यांच्या प्रतिनिधित्वामुळे काही अंशी शेतकरी हिताची जोपासना व्हायला मदत झाली व शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून पूर्वी जी पिळवणूक व्हायची त्याला बहुतांशी प्रतिबंध बसला. परंतु शेतकऱ्यांना मिळणाऱ्या कृषीमालाच्या पैशामधूनच विविध प्रकारचे शुल्क आकारले जाऊ लागल्यामुळे कृषीमालाला चांगला बाजारभाव मिळूनही शेतकऱ्याच्या हातात खूपच कमी पैसे शिल्लक राहायचे. यासाठी शासन स्तरावरून वेळोवेळी बदल करण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र, भारतातील कृषी व्यापारी अधिक प्रबळ व संघटीत असल्यामुळे त्यांच्या दबावापुढे शासनाला झुकावे लागले आहे. पण शेतकऱ्यांच्या विपणन व्यवस्थेत सुधारणा करणे ही आता काळाची गरज निर्माण झालेली आहे. यासाठी शासन, शेतकरी आणि व्यापारी या सगळयांनी एकत्र बसून शेतकरी हिताचा योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :-**

१) भारतात नियोजन काळात कृषी विकासावर अधिक लक्ष देण्यांत आले.
२) ग्रामीण भागातील बहुतांश शेतकरी अर्धशिक्षित आहेत.
३) कृषी क्षेत्रासाठी वीज, सिंचन सुविधा, रस्ते, दळणवळण सुविधा आणि कृषी विपणन या मुलभूत सुविधांची आवश्यकता असते.
४) भारतात कृषीक्षेत्राच्या विकासासाठी मुलभूत सुविधांची कमतरता आहे.
५) कृषी क्षेत्राच्या व शेतकऱ्यांच्या विकासासाठी शासन, शेतकरी आणि व्यापारी यांनी सामोपचाराने निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ :-**

१. संकेत स्थळ :- mr.m.wikipedia.org, Date 14/03/2021
२. संकेत स्थळ :- www.jagran.com, Date 14/03/2021